## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ६२५/२०२० मधील
## निशाण ४७ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे वादी क्र.२ ज्ञानदेव विष्णू कोळी हे दि.०९/०६/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जात नमूद केलेले वारस हेच सरळ व कायदेशीर वारस आहेत. वादी यांनी दाखल केलेल्या निशाण ४६ वरील मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता वादी क्र.२ ज्ञानदेव विष्णू कोळी हे दि.०९/०६/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांनी हा दावा निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता वादी यांचे वारसांना दाव्याचे कारण पुढे चालू राहते. सबब, या कामी अर्जात नमूद केलेले वादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. वादी यांचा निशाण ४७ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मयत वादी क्र.२ यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणेसाठी वादी यांना परवानगी देणेत येत आहे.

३. वादी यांनी आज पासून १४ दिवसांचे आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी.

-

Sd/-

**दिनांक २५.०१.२०२२.** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,विटा,**

**ता. खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS. No.625 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer: S.V.Gaikwad,
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 25.01.2022
Order signed by P.O.on : 25.01.2022
Order uploaded on : 25.01.2022